ePaper
| वर्ष - 8 | अंक - 17 | UDYAM-MH-26-0158827 |

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढवणार: अजित पवार



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**आतील पानांत**

- ऋचा घोषची वादळी खेळी!
- शमीचा धोनीच्या निवृत्तीबद्दल खुलासा
- बायडेन यांची निवडणुकीतून माघार
- नागरिकांसाठी आमचे दरवाजे उघडे

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 22 जुलै 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## पिंपरी चिंचवड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी अजितदादांना दिल्या हटक्या शुभेच्छा

# अखेर तो क्षण आलाच!

## ‘मी अजित आशा-अनंतराव पवार, महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतो की...’

**। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज**

**राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अनेकदा मुख्यमंत्रीपदाने हुलकावणी दिली. मात्र, उपमुख्यमंत्रीपदावर सर्वाधिक वेळा विराजमान होण्याचा रेकॉर्ड अजित पवार यांच्याच नावावर आहे. प्रशासकीय यंत्रणेवर मजबूत पकड असलेले अजितदादा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व्हावेत, अशी त्यांच्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे. अनेकदा भावी मुख्यमंत्री म्हणून त्यांचे बॅनर्स देखील झळकले आहेत. याचीच पुनरावृत्ती पिंपरी चिंचवडमध्ये पाहायला मिळाली. ‘मी अजित आशा-अनंतराव पवार, महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतो की...’ अखेर तो क्षण आलाच!**




अजित पवार यांचा आज म्हणजेच २२ जुलै रोजी वाढदिवस आहे. तत्पुर्वी आज पिंपरी चिंचवड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी अजितदादांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. इतकंच नाही, तर कार्यकर्त्यांनी यावेळी अनोखा केक देखील आणला. या केकवर ‘मी अजित आशा-अनंतराव पवार, महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतो की ...’ अशा आशयाचा मजकूर देखील छापण्यात आला होता. हा केक आपल्या लाडक्या नेत्याने कापावा, अशी इच्छा कार्यकर्त्यांनी बोलून दाखवली. अखेर कार्यकर्त्यांच्या आग्रहाखातर अजित पवार यांनी केक कापून वाढदिवस साजरा केला. तसेच त्यांनी केकचा तुकडा देखील खाल्ला. केकवरील मजकूर वाचून अजित दादांच्या चेहऱ्यावरील उमटलेले स्मित हास्य देखील लपून राहिले नाही. यावेळी काही कार्यकर्त्यांनी अजित पवार महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री अशा घोषणा देखील दिल्या. अजित पवार यांच्या वाढदिवसाच्या एक दिवस आधीच पुण्यासह पिंपरी-चिंचवड शहरात शुभेच्छांचे बॅनर्स लागले आहेत. तरुण कार्यकर्त्यांसह पदाधिकारी तसेच नेत्यांनी अजित पवार यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

### मंत्रालय परिसरात देखील दादांचा बॅनर

अजित पवार यांच्यासोबत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा देखील वाढदिवस आहे. या वाढदिवसानिमित्त मंत्रालय आणि विधानभवन परिसरात कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात शुभेच्छांचे बॅनर्स लागले आहेत. अजित पवार यांना वाढदिवसाचे शुभेच्छा देणारे शेकडो बॅनर हे मंत्रालय परिसरात लावण्यात आले आहेत. परंतु सलीम सारंग जे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र उपाध्यक्ष आहेत, त्यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने जो बॅनर लावलाय त्यातील मजकूर महत्वाचा आहे. तुम्ही मत कोणाला दिलं हे बघणार नाही. पण आपले काम आणि आपलं संरक्षण हे दादाच करणार, अशा आशयाचा मजकूर या बॅनर्सवर छापण्यात आलाय.

## परदेशी मित्रांना घेऊन फिरायला गेला, तिथेच नियतीनं डाव साधला

# पवना धरणात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकाचा बुडून मृत्यू

**। पुणे, मावळ । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

राज्यभरातून मावळ तालुक्यामध्ये पर्यटनासाठी शनिवार आणि रविवारी अनेक पर्यटक येत असतात. त्यातच पवना धरण परिसरामध्ये पर्यटकांची मोठी गर्दी होताना दिसते. याच पवना धरणात एक दुर्घटना घडल्याचं समोर आलं आहे. पवना धरणात पर्यटनासाठी आलेल्या एका २८ वर्षीय तरुणाचा, पर्यटकाचा बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे.



आपल्या परदेशातील मित्रांसोबत हा तरुण पवना डॅमवर पर्यटनासाठी आला होता. मात्र दुर्दैवाने त्याचा बुडून मृत्यू झाला आहे. सागर कैलास साठे (वय २८ वर्ष, रा. देहूरोड, ता. मावळ, जि. पुणे) असं धरणात बुडून मृत्यू झालेल्या व्यक्तीचं नाव आहे. या घटनेमध्ये टेन्ट चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, सागर साठे हा त्याचे प्रदेशातील मित्र स्टीफन जॉन, स्वप्नील कुमार गायकवाड आणि गिदुथुरी रोनाल्ड वन (सिडनी) यांच्यासोबत शनिवारी रात्री पवना धरण परिसरामध्ये असलेल्या कॅम्पिंगवर मुक्कामी आले होते. रविवारी सकाळी सव्वा नऊच्या सुमारास ते सर्वजण पवना धरणाच्या पाण्यामध्ये पोहण्यासाठी उतरले. पाण्यात पोहत असताना सागरला पाण्याचा अंदाज आला नाही आणि तो धरणात बुडू लागला. तो बुडत असताना पाहून नागरिकांनी आरडाओरडा केला. त्यानंतर सागरला, सागरचे मित्र आणि मिल्ट्री कॅम्पमधील नवनाथ करंजुले यांनी त्याला पाण्याबाहेर काढलं. सीपीआर दिला आणि ग्रामीण रुग्णालय काले-कॉलनी इथे नेलं. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केलं. याप्रकरणी टेन्ट चालकावर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. लोणावळा ग्रामीण पोलिसांच्या हद्दीमध्ये हा प्रकार घडला आहे. पुढील तपास लोणावळा ग्रामीण पोलीस करत आहेत.

### अति उत्साही पर्यटकांमुळे त्रास

मावळ तालुक्यामधील पर्यटन फुलू लागलं आहे. त्यामुळे अनेक पर्यटक येथे वर्षा सहलीसाठी येतात. पवना डॅमवरही या काळात पर्यटक येतात. मात्र मोह आवरत नसल्याने पाण्यामध्ये उतरतात आणि आपला जीव गमावून बसतात. प्रशासनाकडून अनेकदा अशा अति उत्साही पर्यटकांना सूचना देखील दिल्या जातात. मात्र, ते या सूचनांना केराची टोपली दाखवून उत्साहात पाण्यात उतरतात. अशा या पर्यटकांमुळे इतर

# तक्रारींसाठी आरटीओची हेल्पलाइन!

## शंभर संदेशांपैकी एखादा संदेश तक्रारीचा असल्याचा अनुभव

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रिक्षा, कॅब अथवा खासगी बसने भाडे नाकारले, जादा भाडे घेतले, अशा प्रवाशांच्या तक्रारींचे निवारण जलद करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) व्हॉट्सअॅप हेल्पलाइन क्रमांक सुरू केला. प्रत्यक्षात या क्रमांकावर तक्रारीऐवजी शुभेच्छा संदेशांचा पाऊस पडू लागला आहे.**




त्यातही बहुतेक तक्रारी रिक्षाबद्दल आहेत.शहरात रिक्षाचालक भाडे नाकारत असल्याच्या तक्रारी प्रवासी नेहमी करतात. याचबरोबर अनेक रिक्षाचालक जवळच्या अंतराचे भाडे नाकारतात अथवा त्यासाठी भाड्यापेक्षा जास्त पैसे मागतात. अनेक जण मीटरने जाण्याऐवजी अव्वाच्या सव्वा रक्कम सांगून प्रवाशांची लूट करतात. याचबरोबर कॅबचालक आणि खासगी बसचालकांबद्दलही प्रवाशांच्या अशाच प्रकारच्या तक्रारी आहेत. मात्र, तक्रार करावयाची झाल्यास ती कशी करावयाची हा मूळ प्रश्न प्रवाशांसमोर उभा राहतो. लेखी तक्रार देण्यासाठी आरटीओमध्ये जाण्यात त्यांना वेळ घालवावा लागतो. त्यामुळे प्रवाशांना सहजपणे तक्रार करता यावी, यासाठी आरटीओने व्हॉट्सअॅप हेल्पलाइन क्रमांक ८२७५३३०१०१ सुरू केला आहे.नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांची तक्रार या क्रमांकावर केल्यानंतर आरटीओचे अधिकारी तक्रारीची शहानिशा करतात. दोषी वाहनचालकांवर कारवाई केली जाते. प्रत्यक्षात या हेल्पलाइन क्रमांकावर सध्या शुभेच्छा संदेशच जास्त प्रमाणात येत आहेत. अनेक जण आरटीओच्या हेल्पलाइनचे कौतुक करीत आहे. या हेल्पलाइनवर दिवसाला सध्या ३०० ते ३५० संदेश येतात. त्यांपैकी केवळ १ ते २ संदेश तक्रारींचे असतात. त्यामुळे या हेल्पलाइनवरच आरटीओकडून तक्रारींसाठी हा क्रमांक असल्याचा खुलासा करावा लागत आहे. हे करताना कर्मचाऱ्यांची दमछाक होत आहे. आमच्या भागात वाहतूककोंडी झाली आहे, या ठिकाणी सिग्नल बसवावा, माझ्या दुकानासमोर कोणी तरी वाहन उभे केले आहे. अशा प्रकारच्या वाहतूक पोलिसांशी निगडित तक्रारी आरटीओच्या हेल्पलाइनवर येत आहेत. त्यावर आरटीओतील कर्मचारी नागरिकांना संबंधित विभागाकडे तक्रार करण्यास सुचवत आहेत. याचबरोबर मुंबईसह राज्यातील इतर ठिकाणांहूनही नागरिक तक्रार करीत आहेत. त्यावर

### हेल्पलाइनवरील तक्रारी

प्रत्यक्षात या हेल्पलाइन क्रमांकावर सध्या शुभेच्छा संदेशच जास्त प्रमाणात येत आहेत. अनेक जण आरटीओच्या हेल्पलाइनचे कौतुक करीत आहे. या हेल्पलाइनवर दिवसाला सध्या ३०० ते ३५० संदेश येतात.प्रवाशाने तक्रार केल्यानंतर त्याची खातरजमातक्रारीच्या अनुषंगाने वाहनमालकाला नोटीसवाहनमालकाचे म्हणणे ऐकून तक्रारीचा निपटारावाहनमालकाने नोटिशीला उत्तर न दिल्यास दुसरी नोटीस दुसऱ्या नोटिशीला उत्तर न दिल्यास थेट कारवाईआमच्या भागात वाहतूककोंडी झाली आहे.

ही हेल्पलाइन केवळ पुणे आरटीओसाठी असल्याचा खुलासा कर्मचाऱ्यांना करावा लागत आहे.शंभर संदेशांपैकी केवळ एखादा संदेश तक्रारीचा असल्याचा अनुभव सध्या आरटीओत येत आहे. त्यातही बहुतेक तक्रारी रिक्षाबद्दल आहेत. शहरात रिक्षाचालक भाडे नाकारत असल्याच्या तक्रारी प्रवासी नेहमी करतात. याचबरोबर अनेक रिक्षाचालक जवळच्या अंतराचे भाडे नाकारतात अथवा त्यासाठी भाड्यापेक्षा जास्त पैसे मागतात. अनेक जण मीटरने जाण्याऐवजी अव्वाच्या सव्वा रक्कम सांगून प्रवाशांची लूट करतात. याचबरोबर कॅबचालक आणि खासगी बसचालकांबद्दलही प्रवाशांच्या अशाच प्रकारच्या तक्रारी आहेत. मात्र, तक्रार करावयाची झाल्यास ती कशी करावयाची हा मूळ प्रश्न प्रवाशांसमोर उभा राहतो. लेखी तक्रार देण्यासाठी आरटीओमध्ये जाण्यात त्यांना वेळ घालवावा लागतो. त्यामुळे प्रवाशांना सहजपणे तक्रार करता यावी, यासाठी आरटीओने व्हॉट्सअॅप हेल्पलाइन क्रमांक ८२७५३३०१०१ सुरू केला आहे.नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांची तक्रार या क्रमांकावर केल्यानंतर आरटीओचे अधिकारी तक्रारीची शहानिशा करतात. दोषी वाहनचालकांवर कारवाई केली जाते.

# शरद पवारांचा अपमान मी केला नाही

## मी त्यांचा अपमान कधीच करू शकत नाही : अजित पवार

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शरद पवार हे माझं दैवत आहेत. मी त्यांचा अपमान कधीच करू शकत नाही. त्यांचा अपमान केला म्हणून काहीजण नॅरेटिव्ह सेट करत आहेत. अजित पवारांनी सुप्रिया सुळे यांनी केलेलं वक्तव्य खोडून काढत प्रत्युत्तर दिलं आहे.**



अजित पवार हे पिंपरी-चिंचवडमध्ये कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलत होते. पुण्यात पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक काल पार पडली. निधी वाटपावरून सुप्रिया सुळे यांनी अजित पवार गटाच्या आमदाराला धारेवर धरलं होतं. यावरून हे राजकारण पेटलेलं होतं. अखेर यावर अजित पवारांनी स्वतः उत्तर दिलं आहे.सुप्रिया सुळे यांनी पिंपरी- चिंचवडच्या सभेमध्ये अजित पवारांवर टीका केली होती. पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आम्हाला बोलू दिलं नसल्याचं म्हणत निधी वाटपाबाबत भेदभाव केल्याचा

### ते माझं दैवत – अजित पवार

कुणाला दुखवायचं नाही, नाराज करायचं नाही. जे प्रश्न असतील ते समजून घेत होतो.अजित पवार हे पिंपरी- चिंचवडमध्ये कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बोलत होते. पुण्यात पुणे जिल्हा नियोजन समितीची बैठक काल पार पडली. निधी वाटपावरून सुप्रिया सुळे यांनी अजित पवार गटाच्या आमदाराला धारेवर धरलं होतं. यावरून हे राजकारण पेटलेलं होतं.

देखील आरोप त्यांनी केला होता. यावरून अजित पवार यांनी काही गोष्टी स्पष्ट केल्या. शरद पवार हे माझं दैवत आहेत. मी त्यांचा अपमान कधीच करू शकत नाही. करणार पण नाही.सुसंस्कृत म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. इथे सर्वांचा आदर केला जातो. त्यामुळे ज्या गोष्टी पसरवल्या जात आहेत त्या चुकीच्या आहेत.पुढे ते म्हणाले, पुणे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आम्हाला बोलू दिले जात नाही. सत्ताधारी बळजबरी करतात आणि आम्हाला निधी दिला जात नाही. या गोष्टींमध्ये काही तथ्य नसल्याचे देखील अजित पवारांनी म्हटले आहे. बैठकीत मी सगळ्यांचं ऐकून घेत होतो.

## “कसा निवडून येतो बघतोच तुला”

# कोल्हेंकडून अजित पवारांची नक्कल!

### गुलाबी जॅकेटवरूनही लगावला टोला!

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

पिंपरी चिंचवडमध्ये नुकताच राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचा विजयी संकल्प मेळावा पार पडला. यावेळी बोलताना खासदार अमोल कोल्हे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. तसेच त्यांनी गुलाबी रंगाच्या जॅकेटवरून अजित पवार यांनाही लक्ष्य केलं. विशेष म्हणजे यावेळी अमोल कोल्हे यांनी अजित पवारांची नक्कलही केली. अमोल कोल्हे यांनी गुलाबी रंगाच्या जॅकेटवरून अजित पवार यांनाही लक्ष्य केलं. तसेच त्यांनी राज्य सरकारवरही टीका केली.





#### नेमकं काय म्हणजे कोल्हे?

महात्मा गांधी यांच्या माकडांचे शिल्प अनेकांना माहिती आहे. ‘बुरा मत बोलो’, ‘बुरा मत सुनो’ आणि ‘बुरा मत देखा’, असा संदेश ते देतात. मात्र, याऐवजी महाराष्ट्रात वेगळंच चित्र आहे. ‘चांगले बोलू नका’, ‘चांगले ऐकू नका’ आणि ‘चांगले बघू नका’, अशा प्रवृत्ती महाराष्ट्रात दिसत आहेत. अशी टीका अमोल कोल्हे यांनी केली. हे सांगतानाच त्यांनी अजित पवारांची नक्कलही केली. चांगले बोलू नका म्हणजेच “कसा निवडून येतो बघतोच तुला”, अशी म्हणत त्यांनी अजित पवारांची नक्कल केली. यावेळी उपस्थितांमध्ये जोरदार हशा पिकला.

#### विविध योजनांवरून राज्य सरकारवर टीका

राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेसाठी ४६ कोटी रुपयांच्या तरतूद केली आहे. बहिणींना त्यांच्या हक्काचं मिळालं पाहिजे, याविषयी दुमत नाही. मात्र, १५०० रुपये महिन्यात काय भागतं? असा प्रश्न आता बहिणीच विचारत आहेत. या सरकारने लाडका भाऊ या योजनेचीदेखील घोषणा केली आहे. मात्र, ती मुख्यमंत्री रोजगार योजना आहे. त्यासाठी साडेपाच हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेनुसार तरुणांना केवळ सहा महिने प्रशिक्षणार्थी म्हणून पगार देण्यात येणार आहे. त्यानंतर त्या तरुणांचे काय? त्यांच्या भविष्याच्या रोजगारांचं का? याबाबत सरकार काहीही बोलत, अशी टीकाही अमोल कोल्हे यांनी केली.

#### गुलाबी जॅकेटवरून लगावला टोला

यावेळी बोलताना अमोल कोल्हे यांनी गुलाबी रंगाच्या जॅकेटवरून अजित पवार यांना लक्ष्य केलं. पिंपरी चिंचवडमध्ये कुणाचातरी मेळावा आहे, असे असं म्हणतात, पण मला असं कळलं की हा मेळावा पिंपरी चिंचवड येथे नसून जयपूरला आहे, कारण ती गुलाबी सिटी आहे, असा टोला त्यांनी लगावला. पुढे बोलताना, कुणी कुठला रंग वापरावा याविषयी कुणाचं दुमत नाही. फक्त तो गुलाबी रंग पिंपरी चिंचवडच्या नागरिकांच्या स्वप्नात दिसावा केवळ राजकीय व्यासपीठावर दिसू नये, अशी प्रतिक्रियाही त्यांनी दिली.

---

## चऱ्होलीत नवीन “आयटी पार्क” ची पायाभरणी!

### भाजपा आमदार महेश लांडगे यांची आणखी एक संकल्पपूर्ती

#### ‘चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉरला’ नवा आयाम

। पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत १९९७ मध्ये समाविष्ट झालेल्या गावांमध्ये राज्य सरकारच्या नवीन आयटी धोरणानुसार, नवीन आयटी पार्क विकसित होत आहे. चऱ्होली बुद्रुक येथील प्राईड वर्ल्ड सिटीच्या माध्यमातून तब्बल ३ दशलक्ष चौरस फूट आयटी पार्क विकसित होणार असून, सुमारे ५० हजार नोकरीच्या संधी या ठिकाणी निर्माण होतील, असे नियोजन करण्यात येत आहे. प्राईड वर्ल्ड सिटी, चऱ्होली बुद्रुक येथे ‘चिखली-मोशी-चऱ्होली रेसिडेन्सिअल कॉरिडॉर’मध्ये पहिला आयटी पार्क विकसित होत आहे. त्याचे भूमिपूजन भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले.




यावेळी प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक व क्रेडाईचे प्रमुख पदाधिकारी अरविंद जैन व बांधकाम क्षेत्रातील नामवंत व्यक्ती उपस्थित होत्या. औद्योगिकनगरी, ऑटो हब, आयटी हब म्हणून नावारुपाला आलेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये आता आणखी एक नवीन आयटी पार्क विकसित करण्याचा ‘संकल्प’ ऑक्टोबर- २०२३ मध्ये केला होता. राज्य शासनाच्या आयटी धोरणानुसार, क्रेडाई व महापालिका प्रशासनासोबत बैठक झाली होती. आमदार लांडगे यांनी घेतलेल्या पुढाकाराला अखेर यश मिळाले आहे. आमदार महेश लांडगे म्हणाले की, समाविष्ट गावांच्या विकासाच्या मुद्यावर आम्ही २०१४ मध्ये विधानसभा निवडणूक लढवली होती. त्यानंतर २०१७ मध्ये महानगरपालिकेत भाजपाची सत्ता आली. त्यानंतर खऱ्या अर्थाने समाविष्ट गावांच्या विकासाला चालना मिळाली. रस्ते, पाणी, वीज आणि कचरा व्यवस्थानासह दळण-वळण आणि पायाभूत सोयी-सुविधा सक्षम केल्यामुळे समाविष्ट गावांमध्ये बांधकाम क्षेत्र झपाट्याने विकसित झाले. उद्योग, बांधकाम आणि सेवा क्षेत्रातील सर्व घटकांना या ठिकाणी प्रगती होवू शकते, असा विश्वास निर्माण झाल्यामुळे हे साध्य होत आहे. राज्य शासनाच्या नव्या आयटी धोरणानुसार, समाविष्ट गावांतील चऱ्होली बुद्रुकमध्ये आयटी पार्क विकसित होतो आहे, याचे मनोमन समाधान आणि अभिमान वाटतो.


> “ राज्याच्या नवीन आयटी- २०२३ धोरणाची पिंपरी-चिंचवडमध्ये प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह आणि क्रेडाईचे सदस्य बांधकाम व्यावसायिक अरविंद जैन यांच्यासोबत सविस्तर बैठक ऑक्टोबर- २०२३ मध्ये झाली होती. आज जुलै- २०२४ मध्ये प्रस्तावित प्रकल्पाचे भूमिपूजन होत आहे. राज्यात माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती होणार आहे. यामुळे समाविष्ट गावांतील विकासाचा ‘बॅकलॉग’ भरुन काढण्यात आपण यशस्वी होवू, असा विश्वास वाटतो.
>
> **-महेश लांडगे,**
> आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.



## भूमिका

**सामाजिक, शैक्षणिक चळवळीच्या उत्थानाची बीजे असणाऱ्या, 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या ब्रीदवाक्यातून माणूसपणाचे भान देणाऱ्या 'बहिष्कृत हितकारिणी सभा' या संस्थेला नुकतीच (२० जुलै) शंभर वर्षे पूर्ण झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेली ही पहिली संघटना या एका उल्लेखातूनच तिचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित होते.**

# 'बहिष्कृत हितकारिणी सभे'ची शंभर वर्षे



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. तिला काल १०० वर्षे पूर्ण झाली. या सभेच्या 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' या ब्रीदवाक्याची सुद्धा शंभरी होत आहे. डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेली ही पहिली सार्वजनिक संघटना. तिचा प्रभाव आजही समाजमनावर दिसून येतो, त्यामुळे शतकपूर्तीनिमित्ताने या संघटनेवर व डॉ. आंबेडकरांच्या दूरदर्शी विचारांवर चर्चा होणे गरजेचे आहे.९ मार्च १९२४ ला दामोदर हॉल, परळ येथे डॉ. आंबेडकर यांनी आपल्या सहकाऱ्यांशी चर्चा करून सभा घेतली. त्यानुसार २० जुलै १९२४ ला बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना झाली. या सभेच्या सदस्यांमध्ये सर चिमणलाल सेटलवाड, मेयर निस्सीम, रुस्तुमजी जीनवाला, जी. के. नरिमन, डॉ. र. पु. परांजपे, बी. जी. खेर, नानाजी मारवाडी, झीनाभाई राठोड, केशव वाघेला यांच्यासह काही चर्मकार, मातंग व महार सदस्यांचा समावेश होता. अस्पृश्यांच्या प्रश्नांच्या संदर्भात अस्पृश्यांनी भूमिका घेणे जसे गरजेचे होते, तसेच स्पृश्य समाजानेसुद्धा या बाबतीत भूमिका घेणे गरजेचे आहे, हा विचार शंभर वर्षांपूर्वी जेवढा महत्त्वाचा होता, तेवढाच आजही महत्त्वाचा आहे. दोघांनीही भूमिका घेतल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. यावरून डॉ. बाबासाहेबांचा हा विचार किती दूरदर्शी होता, याची जाणीव होते.

बहिष्कृत हितकारिणी सभेचे उद्देश व नियम विचारपूर्वक तयार केले गेले होते. त्याला कठोर अशी शिस्त होती, हे सभेच्या प्रसिद्ध झालेल्या अहवालावरून स्पष्ट होते. बहिष्कृत वर्गाच्या चालू परिस्थितीची माहिती गोळा करून व ती लोक निदर्शनास आणून त्यावर लोकमत तयार करणे, त्याचप्रमाणे सरकारकडून त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे व त्यांच्या उन्नतीस जरूर त्या सवलती मिळाव्यात म्हणून प्रयत्न करणे. बहिष्कृत वर्गात जागृती करणे व त्याप्रीत्यर्थ प्रचारक नेमणे, बहिष्कृत वर्गात त्यांच्या हक्कांची जाणीव उत्पन्न करून ते त्यांना प्राप्त करून देण्याचा प्रयत्न करणे. शिक्षणप्रसार करणे, वाचनालये स्थापणे, विद्यार्थी वसतिगृहे काढणे, लायक विद्यार्थ्यांस शिष्यवृत्त्या देणे व देवविणे, समाजजागृतीसाठी कीर्तने किंवा मॅजिक लॅटर्नद्वारे व्याख्याने वगैरेंची व्यवस्था करणे, आर्थिक उन्नतीच्या जरूर त्या योजना व सूचना तयार करून योग्य अधिकाऱ्यास सादर करणे, इ. या सर्व उद्देशांना अनुसरून बहिष्कृत हितकारिणी सभेची वाटचाल नंतरच्या काळात झाली. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" हे बहिष्कृत हितकारिणी सभेचे ब्रीदवाक्य आहे. हे फक्त तीन शब्द नाहीत, तर अस्पृश्यांच्या दु:ख निर्मूलनाचा मूलमंत्र या तीन शब्दांमध्ये सामावलेला आहे. भारतीय सामाजिक प्रबोधनाच्या इतिहासात चिरायु असणारे हे शब्द आहेत. या शब्दांनी जशा बहिष्कृतांच्या अनेक पिढ्या घडवल्या, तसेच हे शब्द संपूर्ण भारतातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शक आहेत आणि आता तर या शब्दांची चर्चा जागतिक पातळीवर होत आहे. जगभरातील नाकारलेल्या समूहांनाही प्रेरणा देण्याचे काम हे शब्द करत आहेत. तत्कालीन बहिष्कृत हितकारिणी सभेतर्फे प्रत्येक जिल्ह्यातून लोकजागृतीसाठी सभा आयोजित करण्याचा कार्यक्रम राबवला होता. बेळगाव जिल्ह्यातील निपाणी या ठिकाणी तिसरे मुंबई इलाका प्रांतिक बहिष्कृत परिषद अधिवेशन घेण्यात आले. या सभेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या भाषणाचा एवढा परिणाम झाला की, बेळगावला १ जून १९२७ ला एक वसतिगृह सुरू करण्यात आले. या वसतिगृहाची जबाबदारी बळवंत हनुमंत वराळे यांनी स्वीकारली. नंतर ते वसतिगृह १९२९ ला धारवाडला स्थलांतरित झाले. काही दिवसांनी जळगाव, पनवेल (ठाणे येथे स्थलांतरित) व अहमदाबाद या ठिकाणी विद्यार्थी वसतिगृहे स्थापन करण्यात आली.

## प्रासंगिक »

### विद्यार्थ्यांचा विद्रोह

***शेख हसीनांना त्यांचे राजकीय यश देशाच्या औद्योगिक, आर्थिक प्रगतीत रूपांतरित करता आले असते तर हा आरक्षणाचा मुद्दा इतका प्रक्षोभक झाला नसता..***

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळेच शमण्याची चिन्हे रविवारी दिसली. मात्र तोवर या आंदोलनातील हिंसाचारात शंभरहून अधिक बळी गेले असून अजूनही राजधानी ढाका आणि अन्यत्र संचारबंदी आहे. कोणत्याही देशात विद्यार्थीच जेव्हा रस्त्यावर येतात तेव्हा त्या आंदोलनास हाताळणे आव्हान असते. तारुण्यसुलभ प्रक्षोभ अनावर असतो. त्यामागील कारणे किती योग्य-अयोग्य हा मुद्दा वेगळा आणि ती हिंसक मार्गाने व्यक्त व्हावीत का ही बाब वेगळी. इतका विवेक त्या वयात असतोच असे नाही आणि ही बाब समर्थनीय आहे असेही नाही. अशी आंदोलने शांत करण्यासाठी एक तर समंजस नेतृत्व हवे किंवा दुसरे टोकाचे—आणि अत्यंत निंद्य— उदाहरण म्हणजे ते चीनच्या डेंग शियाओपिंग यांच्याप्रमाणे हवे. त्यांनी १९८९ साली त्या देशातील विद्यार्थ्यांचे आंदोलन तिआनान्मेन चौकात अत्यंत निर्घृणपणे चिरडले.

मोदींचा करिष्मा, लोकांसाठी योजना आणि हिंदुत्व ही भाजपच्या विजयाची त्रिसूत्री होती. आता यातील प्रत्येक सूत्र भाजपसाठी आव्हान बनून उभे राहिले आहे. तीन-चार महिन्यांत महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड आणि जम्मू काश्मीर या चार महत्त्वाच्या राज्यांमध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे.

# हिंदुत्व येईना कामाला, आव्हानांचा भार वाढीला

लोकसभा निवडणुकीत अपेक्षित यश न मिळाल्याने या चार राज्यांतील विधानसभा निवडणुकीचा निकाल भाजपसाठी पक्ष म्हणून पुढची दिशा निश्चित करणारा व केंद्रातील सत्ता बळकट करणारा असेल; पण या राज्यांमध्ये यश मिळेल याची खरेतर भाजपलाही खात्री नाही. सध्या भाजपमध्ये अंतर्गत घमासान सुरू आहे. पक्षामध्ये अजूनही पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच सर्वोच्च असले तरी पक्ष संघटनेच्या उतरंडीत दुसऱ्या क्रमांकासाठी तीव्र स्पर्धा सुरू झाली आहे. सत्तेच्या विभागणीत मोदींनंतर अमित शहा असे मानले जात असले तरी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्पर्धेत आहेतच. ही पक्षांतर्गत स्पर्धा केंद्रातील मोदींच्या नेतृत्वाखालील एनडीएचे सरकार अस्थिर असल्याचे लक्षण असू शकते. त्यामुळेच लोकसभा निवडणुकीनंतर भाजप समोरील आव्हाने कितीतरी पटीने वाढू लागली आहेत, असे



दिसते.लोकसभा निवडणुकीत मोदींची गॅरंटी, मोदींची प्रतिमा व त्यांचे नेतृत्व यांची कमाल दिसली नाही. आगामी विधानसभा निवडणुकांत मोदींचा करिष्मा किती उपयोगी पडेल हा प्रश्नच आहे. हिंदुत्वाचा मुद्दा महत्त्वाचा असता तर लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये भाजपला सहज विजय मिळवता आला असता पण या निवडणुकीत भाजपला २८ पैकी फक्त नऊ जागा जिंकता आल्या. राज्यात मराठा विरुद्ध ओबीसी हा आरक्षणाचा तिढा भाजपच्या अंगाशी येणार नाही, यासाठी केंद्रीय नेतृत्वाला पावले उचलावी लागणार आहेत.हरियाणामध्ये जाट व जाटेतर विभागणी करून राज्य जिंकण्याचा इरादा फोल ठरण्याची भीती लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर व्यक्त केली जात आहे. झारखंडमध्ये आदिवासींची नाराजी भाजपला परवडणारी नाही. म्हणूनच कदाचित झारखंड मुक्ती मोर्चाचे प्रमुख व मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना जामिनावर सोडून द्यावे लागले आहे. दिल्लीत आता विधानसभेची निवडणूक झाली असती तर अरविंद केजरीवाल यांनाही जामिनावर सोडून द्यावे लागले असते. मात्र दिल्लीची विधानसभा निवडणूक पुढील वर्षी जानेवारी- फेब्रुवारीमध्ये होणार आहे. तोपर्यंत कदाचित केजरीवाल स्वतःचा मार्ग मोकळा करण्याचा जोरदार प्रयत्न करू शकतील. जम्मू काश्मीरमध्ये दहशतवादाने डोके वर काढले आहे. या वेळी काश्मीर खोऱ्यापेक्षा दहशतवाद्यांनी जम्मूमध्ये हल्ले केले आहेत. अनुच्छेद ३७० रद्द केल्यानंतरही तिथे दहशतवादाचा बीमोड झालेला नाही, ही बाब तिथल्या विधानसभा निवडणुकीत प्रतिबिंबित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शाह यांची शरद पवारांवर टीका!

## ज्या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप, ते आज भाजपाबरोबर”

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**भारताच्या राजकारणातील भ्रष्टाचाराचे म्होरके कोणी असतील तर ते शरद पवार आहेत, अशी टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पुण्यातील भाजपाच्या मेळाव्यात बोलताना केली होती. त्यांच्या या टीकेनंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दरम्यान, शरद पवारांवर केलेल्या या टीकेला आता खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. टीव्ही ९ वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.**



“शरद पवार यांच्यावर टीका करत नाही, तोपर्यंत हेडलाईन होत नाही, हे अमित शाह यांना माहिती आहे. त्यामुळेच त्यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली आहे”, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली. “आज भाजपाचे लोक ज्याला एनडीए सरकार म्हणतात, ते काही महिन्यांपूर्वी मोदी सरकार होतं. याच मोदी सरकारने शरद पवार यांना पद्मविभूषण देऊन त्यांचा गौरव केला होता. अमित शाह हे त्याच सरकारमध्ये मंत्री होते. मात्र, हे सर्व ते विसरले असतील, त्यामुळे त्यांनी टीका केली”, असं प्रत्युत्तरही सुप्रिया सुळे यांनी दिलं.यावेळी बोलताना त्यांनी भारतीय जनता पक्षावर टीकाही केली. “भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्रातील ज्या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले, ते नेते आज महायुती सरकारमध्ये मंत्री आहेत. महाराष्ट्रच नाही, तर त्यांनी काश्मीर ते कन्याकुमारपर्यंत ज्या नेत्यांवर त्यांनी आरोप केले, त्यापैकी ९० टक्के नेते आज भाजपाच्या बरोबर आहेत”, असे त्या म्हणाल्या.पुढे बोलताना अमित शाह यांनी उद्धव ठाकरेंवर केलेल्या टीकेबाबतही सुप्रिया सुळे यांनी भाष्य केलं. “उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करण्यासाठी भाजपाकडे मुद्दे नाहीत. त्यांनी त्यांचा पक्ष फोडला. त्यांचे नेते पळवून नेले, त्यांच्यावर इतका अन्याय झाला. आता त्यांच्यावर बोलण्यासारखं काहीही नाही. त्यामुळे अमित शाह यांच्याकडून अशाप्रकारे टीका केली जात आहे”, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.पुण्यात भाजपाच्या दोन दिवस राज्य कार्यकारिणीचे आयोजन करण्यात आले होते. याचा समारोप केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थित झाला. यावेळी बोलताना अमित शाह यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली होती. भारताच्या राजकारणातील भ्रष्टाचाराचे म्होरके कोणी असतील तर ते शरद पवार आहेत. भ्रष्टाचाराला संस्थात्मक रुप देण्याचे काम शरद पवार यांनी केलं आहे, असं अमित शाह म्हणाले होते.भारताच्या राजकारणातील भ्रष्टाचाराचे म्होरके कोणी असतील तर ते शरद पवार आहेत, अशी टीका

### शाह यांनी नेमकं काय म्हटलं होतं?

“उद्धव ठाकरे यांच्यावर टीका करण्यासाठी भाजपाकडे मुद्दे नाहीत. त्यांनी त्यांचा पक्ष फोडला. त्यांचे नेते पळवून नेले, त्यांच्यावर इतका अन्याय झाला. आता त्यांच्यावर बोलण्यासारखं काहीही नाही. त्यामुळे अमित शाह यांच्याकडून अशाप्रकारे टीका केली जात आहे”, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.पुण्यात भाजपाच्या दोन दिवस राज्य कार्यकारिणीचे आयोजन करण्यात आले होते. याचा समारोप केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थित झाला.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पुण्यातील भाजपाच्या मेळाव्यात बोलताना केली होती. त्यांच्या या टीकेनंतर आता विविध राजकीय प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. दरम्यान, शरद पवारांवर केलेल्या या टीकेला आता खासदार सुप्रिया सुळे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. टीव्ही ९ वृत्तवाहिनीशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. “शरद पवार यांच्यावर टीका करत नाही, तोपर्यंत हेडलाईन होत नाही, हे अमित शाह यांना माहिती आहे. त्यामुळेच त्यांनी शरद पवार यांच्यावर टीका केली आहे”, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली. “आज भाजपाचे लोक ज्याला एनडीए सरकार म्हणतात, ते काही महिन्यांपूर्वी मोदी सरकार होतं. याच मोदी सरकारने शरद पवार यांना पद्मविभूषण देऊन त्यांचा गौरव केला होता. अमित शाह हे त्याच सरकारमध्ये मंत्री होते. मात्र, हे सर्व ते विसरले असतील, त्यामुळे त्यांनी टीका केली”, असं प्रत्युत्तरही सुप्रिया सुळे यांनी दिलं.यावेळी बोलताना त्यांनी भारतीय जनता पक्षावर टीकाही केली. “भारतीय जनता पक्षाने महाराष्ट्रातील ज्या नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप केले, ते नेते आज महायुती सरकारमध्ये मंत्री आहेत. महाराष्ट्रच नाही, तर त्यांनी काश्मीर ते कन्याकुमारपर्यंत ज्या नेत्यांवर त्यांनी आरोप केले, त्यापैकी ९० टक्के नेते आज भाजपाच्या बरोबर आहेत”, असे त्या म्हणाल्या.पुढे बोलताना अमित शाह यांनी उद्धव ठाकरेंवर केलेल्या टीकेबाबतही सुप्रिया सुळे यांनी भाष्य केलं.

# रायगडात सावित्री नदीने धोका पातळी ओलांडली

## कुंडलिका नदी इशारा पातळीवर; महाड, रोहा परिसराला पुराचा धोका

। मुंबई ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नद्यांच्या पाणी पातळीत मोठी वाढ झाली आहे. सावित्री नदीने धोका पातळी ओलांडली आहे. तर कुंडलिका नदी इशारा पातळीच्या वर वाहत आहेत. त्यामुळे महाड आणि रोहा शहरांना पुराचा धोका निर्माण झाला आहे.**



महाबळेश्वर आणि पोलादपूरच्या खोऱ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सावित्री नदीच्या पातळीत मोठी वाढ झाली आहे. महाबळेश्वर परिसरात रविवारी सकाळी आठ वाजेपर्यंत संपलेल्या २४ तासात १५९ मिलीमिटर पावसाची नोंद झाली. तर पोलादपूर येथे १३४ मिमी, महाड येथे १४५ मिमी पावसाची नोंद झाली. रविवारी दिवसभर या परिसरात पावसाचा जोर कायम होता. त्यामुळे सावित्री नदीने दुपारी २ च्या सुमारास इशारा पातळी ओलांडली. त्यामुळे महाड शहराला पुराचा धोका निर्माण झाला आहे. शहरात पुराचे पाणी कुठल्याही क्षणी शिरण्यास सुरुवात होणार आहे. त्यामुळे महाड शहर आणि लगतच्या परिसराला सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. एनडीआरएफची एक तुकडी या ठिकाणी तैनात करण्याVत आली आहे.भिरा धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने डोलवाहल बंधारा येथे कुंडलिका नदीने इशारा पातळी ओलांडली आहे. नदी २३ मीटरच्या इशारापातळीवरून वाहत असल्याने, रोहा शहर आणि त्यालगत असलेल्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला.

### समुद्राला मोठी भरती येणार

अशात पावसाचा जोर कायम राहिल्यास नदीच्या पाण्यात मोठा फुगवटा तयार होऊ शकणार आहे. जिल्ह्यात सर्वत्र पावसाचा जोर कायम आहे. त्यामुळे पाताळगंगा, आंबा आणि उल्हास नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली होती. अलिबाग, तळा, पेण आणि महाड येथे घरांची पडझड झाली आहे.रविवारी सकाळी आठ वाजेपर्यंत म्हसळा १४४ मिमी, माथेरान १०२ मिमी, तळा १२४ मिमी, श्रीवर्धन १५५ मिमी नोंदविला गेला आहे. रविवारी सकाळी आठ ते सायंकाळी पाचपर्यंत महाबळेश्वर १४५ मिमी, महाड ६२ मिमी, पोलादपूर १०२ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

# बायडेन यांची निवडणुकीतून माघार!

## पक्ष यांच्या हिताच्या दृष्टीने मी हा निर्णय घेतल्याचे केले स्पष्ट

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीतून माघार घेत असल्याचं जाहीर केलं. अमेरिका आणि माझा पक्ष यांच्या हिताच्या दृष्टीने मी हा निर्णय घेतला आहे असं बायडेन यांनी स्पष्ट केलं. चार महिन्यात अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे. माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि बायडेन यांच्याबरोबरच्या डिबेटदरम्यानही बायडेन यांना आपली भूमिका ठोसपणे मांडता आली नव्हती. काही दिवसांपूर्वी बायडेन यांना करोना संसर्ग झाला होता. या संसर्गामुळे श्वसनाचा त्रासही सुरू झाला होता.गेल्या काही दिवसात डेमोक्रॅट्स पक्षातूनच बायडेन यांनी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतून माघार घ्यावी असे प्रयत्न सुरू होते. या सगळ्याची परिणती बायडेन यांच्या घोषणेत झाली.**



सोशल मीडिया अकाऊंटच्या माध्यमातून बायडेन यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. 'अमेरिकेसारख्या बलशाही देशाचं राष्ट्राध्यक्षपद भूषवणं हा सर्वोच्च सन्मानाचा क्षण आहे असं बायडेन यांनी म्हटलं आहे. पुन्हा एकदा राष्ट्राध्यक्षपदी निवडून येण्याची माझी इच्छा आणि तयारी होती पण देशाचं आणि डेमोक्रॅट्स पक्षाचं हित लक्षात घेऊन मी राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीतून बाजूला होण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यमान राष्ट्राध्यक्ष या नात्याने उर्वरित कार्यकाळात माझ्या कर्तव्यांना पूर्णत:न्याय देण्याचा माझा प्रयत्न असेल. यासंदर्भात काही दिवसातच देशवासीयांना संबोधित करेन', असं बायडेन यांनी म्हटलं आहे. बायडेन यांनी उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांचे आभार मानले आहेत. त्या एक सक्षम सहकारी आहेत अशा शब्दात बायडेन यांनी हॅरिस यांच्या कामाचं कौतुक केलं आहे. बायडेन यांनी आपल्या पत्रकात लिहिलं की, 'गेल्या तीन साडेतीन वर्षात एक देश म्हणून आपण प्रगतीपथावर आहोत. सध्याच्या घडीला अमेरिकेची अर्थव्यवस्था जगातली भक्कम अशी आहे. देशाची पुनर्उभारणी करण्याच्या दृष्टीने आपण ऐतिहासिक गुंतवणूक केली आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी औषधांच्या किमती कमी करणं, अमेरिकेच्या नागरिकांना सर्वोत्तम दर्जाची आरोग्य सेवा पुरवणं यासाठी आपण कटिबद्ध आहोत. घातक गोष्टींचा सामना करणाऱ्या ज्येष्ठांना आपण अतिशय त्वरेने सर्वोत्तम अशी मदत पुरवली आहे. ३० वर्षात पहिल्यांदाच शस्त्र सुरक्षा कायदा पारित केला. सर्वोच्च न्यायालयात पहिल्यांदाच आफ्रो-अमेरिकन वंशाच्या विधिज्ज्ञांची नियुक्ती झाली. हवामान बदलाला सामोरं जाण्याकरता जगात पहिल्यांदाच अशा नियमांची तरतूद केली. अमेरिका जगाचं नेतृत्व करण्यासाठी यापेक्षा सक्षम स्थितीत कधीच नव्हता'. ते पुढे लिहितात, 'मला कल्पना आहे यापैकी काहीही तुमच्या सगळ्यांच्या सहकार्याशिवाय शक्य नव्हतं. एकमेकांना साथ देत आपण करोनासारख्या अभूतपूर्व संकटाचा सामना केला. त्यानंतर उद्भवलेल्या आर्थिक मंदीला आपण एकमेकांच्या साथीने सामोरे गेलो. आपण आपल्या लोकशाहीचं प्राणपणाने जतन केलं. याच्या बरोबरीने जगभरातल्या आपल्या मित्रराष्ट्रांशी संबंध दृढ केले'. 'अमेरिकासारख्या महान देशाचं प्रमुखपद मला भूषवायला मिळाला हा माझा सर्वोच्च सन्मान आहे. पुन्हा या पदी निवडून येण्यासाठी मी प्रयत्नशील होतो पण देशाचं आणि पक्षाचं हित घेऊन मी निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. राष्ट्राध्यक्ष म्हणून उर्वरित कार्यकाळात कर्तव्यं निष्ठेने पूर्ण करण्याचा माझा प्रयत्न असेल. माझ्या निर्णयासंदर्भात देशवासीयांशी लवकरच संवाद साधेन', असं बायडेन यांनी म्हटलं आहे.

### उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांचे आभार


'मी पुन्हा राष्ट्राध्यक्षपदी निवडून यावं यासाठी असंख्य लोकांनी अथक प्रयत्न केले. त्या सगळ्यांप्रति मी कृतज्ञता व्यक्त करतो. उपराष्ट्राध्यक्ष कमला हॅरिस यांचे मी आभार मानू इच्छितो. त्यांनी मला खंबीरपणे साथ दिली. तुम्ही आमच्यावर जो विश्वास दाखवलात आणि पाठिंबा दिलात त्यासाठी मनापासून आभार मानतो. जेव्हा आपण सगळे एकत्र असतो तेव्हा अमेरिकेला काहीच अप्राप्य नाही असं मला वाटतं. युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिकेचे या ऐतिहासिक वारसा सांगणाऱ्या देशाचे आपण नागरिक आहोत हे आपण लक्षात ठेवायला हवं', असं बायडेन यांनी म्हटलं आहे. अमेरिकेचे विद्यमान राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी राष्ट्राध्यक्षपदाच्या शर्यतीतून माघार घेत असल्याचं जाहीर केलं.

# पीडित नागरिकांसाठी आमचे दरवाजे उघडे

## हिंसक घटनांच्या पार्श्वभूमीवर ममताचे मोठं विधान!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बांगलादेशमध्ये नोकऱ्यांमधील आरक्षणाच्या मुद्द्यावरून मोठ्या प्रमाणात आंदोलन सुरू आहे. अनेक ठिकाणी हिंसाचाराच्या घटना घडल्या आहेत. यात जवळपास १३३ जणांचा मृत्यू झाला आहे. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बनर्जी यांनी मोठं विधान केलं आहे. बांगलादेशातील पीडित नागरिकांसाठी आमचे दरवाजे उघडे असून त्यांनी मदत मागितल्यास त्यांना आश्रय देऊ, असे त्या म्हणाल्या.**





त्यांच्या विधानानंतर आता विविध राजकीय चर्चांनाही उधाणं आहे.मी बांगलादेशबाबत जास्त काही बोलू शकत नाही, कारण तो एक स्वतंत्र देश आहे. त्याबाबत भारत सरकार प्रतिक्रिया देईल. मात्र, बांग्लादेशमधील पीडितांनी पश्चिम बंगालचा दरवाजा ठोठावला, तर आम्ही त्यांना नक्कीच मदत करु, त्यांना पश्चिम बंगालमध्ये आश्रय देऊ, अशी प्रतिक्रिया ममता बॅनर्जी यांनी दिली. तसेच ज्यांचे नातेवाईक हिंसाचारग्रस्त बांगलादेशात अडकले आहेत, अशा सर्व बंगालमधील रहिवाशांना आम्ही मदत करू.

बांगलादेशाबाबत कुठल्याही अफवांना बळी पडू नये, असं आवाहनही त्यांनी केलं.पुढे बोलताना त्यांनी केंद्रातील मोदी सरकावर जोरदार टीकाही केली. भाजपाने विरोधकांना धमकावून आणि तपास संस्थांचा गैरवापर करून केंद्रात सरकार स्थापन केले आहे. भाजपाविरोधात आजपर्यंत आपण अनेक लढाया लढलो आहेत. अजून बरीच लढाई आपल्याला लढायची आहे

### मोदी सरकारवरही केली टीका

बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाने मोठा निर्णय घेत आरक्षणाचा निर्णय मागे घेतला आहे. देशातील ९३ टक्के पदे गुणवत्तेनुसार भरली जातील. उर्वरित २ टक्के पदे वांशिक अल्पसंख्याक, पारलिंगी व्यक्ती आणि अपंग लोकांसाठी राखीव असतील, असे बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं आहे. तसेच स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्यांच्या वंशजांसाठी देण्यात आलेलेल ३० टक्के आरक्षण कमी करुन ते ५ टक्क्यांवर आणत असल्याचेही न्यायालयाने म्हटले आहे. बांगलादेशमध्ये नोकऱ्यांमधील आरक्षणाच्या मुद्द्यावरून मोठ्या प्रमाणात आंदोलन सुरू आहे.

# तेव्हा माझं करिअर संपेल सलमान खान

बॉलीवूड अभिनेता सलमान खान गेल्या काही दिवसांपासून त्याच्या घरावर झालेल्या गोळीबारामुळे चर्चेत होता. परंतु, सध्या सलमान खानने ३५ वर्षांपूर्वी एक पत्र सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. 'मैंने प्यार किया' चित्रपटाच्या यशानंतर भाईजानने हे पत्र त्याच्या समस्त चाहत्यांना लिहिलं होतं. तसंच अभिनेता म्हणून प्रेक्षकांनी स्वीकारल्याबद्दल सलमानने त्याच्या चाहत्यांचे आभार मानले होते. सलमानचं हे पत्र मूळ स्वरुपात सिने ब्लिट्ज मासिकात प्रसिद्ध झालं होतं.सलमान खानने त्याच्या पत्रात नेमकं काय लिहिलं होतं याची उत्सुकता अनेकांना आहे. अभिनेत्याने त्याच्या लाखो प्रेक्षकांचे कसे आभार मानले जाणून घेऊयात... सलमान लिहितो, "मला आज तुम्हा सर्वांना माझ्याबद्दल काहीतरी सांगायचं आहे. सर्वप्रथम, एक अभिनेता म्हणून मला स्वीकारल्याबद्दल तुमचे खूप खूप आभार...मी माझ्या प्रत्येक चित्रपटात तुमच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करेन. सध्या प्रत्येक चित्रपटाची निवड करण्यापूर्वी मी भरपूर विचार करत आहे. माझ्या विवेकबुद्धीनुसार मी चांगल्या कथांवर लक्ष केंद्रित करत आहे. कारण, मला माहित आहे की, यानंतर मी जे काही चित्रपट करेन त्याची तुलना 'मैंने प्यार किया'शी होणार आहे. त्यामुळे भविष्यात मी जेव्हा पण चित्रपटाची घोषणा करेन तेव्हा खात्री बाळगा की, तो एक चांगला चित्रपट असेल आणि मी त्यासाठी माझे शंभर टक्के देईन."सलमान पुढे लिहितो, "मी तुम्हा सर्वांवर प्रचंड प्रेम करतो आणि आशा करतो की तुम्ही सुद्धा माझ्यावर तसंच प्रेम करत राहाल.

# ३३ वर्षांपूर्वीच्या सुबोध भावेला पाहिलंत का?

चित्रपट असो वा मालिका आपल्या वेगवेगळ्या भूमिकांमधून अभिनयाचं कौशल्य दाखवत प्रेक्षकांची मन जिंकणारा अभिनेता म्हणजेच सुबोध भावे. सुबोधने त्याच्या पत्नी मंजिरीसाठी एक खास व्हिडी शेअर केला आहे. याबरोबरच तो एक नवीन गोष्ट प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येणार असल्याचंही सुबोध म्हणाला आहे. याबाबत सुबोधने त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर एक खास व्हिडीओ शेअर केला आहे.व्हिडीओमध्ये सुबोध भावे म्हणाला, "नमस्कार, आज आमच्या सेटवरून एक खास गोष्ट तुमच्याशी शेअर करायचीय. नवीन, नाजूक, हळूवार रोमँटीक गोष्ट लवकरच घेऊन येतोय मी तुमच्या सगळ्यांसाठी. आजच्या दिवशी ही गोष्ट शेअर करावीशी वाटली कारण आजचा दिवस खूप महत्त्वाचा आहे. आज ६ मे आणि बरोबर ३३ वर्षांपूर्वी १९९१ साली मी मंजिरीला प्रपोज केलं होतं आणि तिने मला हो म्हटलं होतं.""मंजिरी आठवतंय ना आणि कुठे हो म्हटलं होतस हे आठवतय का? पुण्याच्या बालगंधर्वच्या पुलावर. आमची ही लव्हस्टोरी सुरू झाली मग त्याच्यानंतर तिच काही वर्ष इथे असणं. मग अचानक कॅनेडाला निघून जाण. मग ती पत्र, चोरून पाठवलेली पत्र, मित्रांच्या नावाने पाठवलेली पत्र, त्यांची वाट बघण्यात गेलेले अनेक दिवस, मग हळूहळू इमेल्स आणि मग ४ ५ वर्षांच्या विराहानंतर मंजिरी परत आली. आठवतंय का?""पण खर सांगतो तुझ्याबरोबर त्यानंतर आयुष्यातल्या सगळ्या सुख दुखांच्या गोष्टी शेअर केले पण तुझ्याबरोबरची प्रत्येक आठवण ही मात्र गोडच आहे आणि मंजिरी तू मला विश्वास दिलास की जगायला श्वासाची नाही प्रेमोची गरज असते.

# नाच गं घुमा!

परेश मोकाशी यांची चित्रपट दिग्दर्शित करण्याची आणि तो हाताळण्याची एक वेगळी हातोटी आहे. 'हरिश्चंद्राची फॅक्टरी'पासून 'वाळवी'पर्यंत हे आपण लक्षात घेतलं आहेच. आता त्यांचा नवा चित्रपट आला आहे ज्याचं नाव आहे 'नाच गं घुमा' मुक्ता बर्वे, नम्रता संभेराव, सुकन्या मोने, सुप्रिया पाठारे, शर्मिष्ठा राऊत, सारंग साठे यांच्या प्रमुख भूमिका असलेला चित्रपट आहे. चित्रपटाची कथा उच्च मध्यमवर्गीय त्रिकोणी घरात घडते. घरात कामासाठी बाई आली नाही किंवा वेळेवर आली नाही किंवा तिने सुट्टीच घेतली तर काय? या आजकालच्या नोकरी करणाऱ्या गृहिणीपुढे पडलेल्या प्रश्नांवर हा चित्रपट आधारलेला आहे. राणी (मुक्ता बर्वे) आणि आनंद (सारंग साठे) यांना शाळेत जाणारी एक मुलगी चिकू (मायरा वायकूळ) आहे. या दोघांनाही नोकरीसाठी जावं लागत असल्याने चिकूला सांभाळण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी बारा तास काम करणारी बाई त्यांना हवी आहे. आशाताई (नम्रता संभेराव) या त्यांच्याकडे येतात. पण त्या वेळ पाळत नसतात. म्हणून राणी त्यांना कामावरुन काढून टाकते. पण मग राणी आणि आनंदची पंचाईत होऊ लागते, पण आशाताईंना परत काम दिलं जातं. आधी वेळ न पाळणाऱ्या आशाताई वेळेवर येऊ लागतात. नंतर एके दिवशी एक घटना घडते ज्यानंतर राणी अक्षरशः हाताला धरुन हाकलून देते. या सगळ्यानंतर काय काय घडतं?, आशाताई असं काय वागतात? राणीचं काय होतं? आनंदची भूमिका काय? या दोघांच्याही आया घरात राहण्यासाठी येतात तेव्हा काय होतं ? या सगळ्यावर सिनेमा भाष्य करतो.



# बांदेकरांनी सांगितला बॉलीवूडचा अनुभव

सुचित्रा बांदेकर यांनी केवळ मराठीतच नव्हे तर बॉलीवूडमध्येही आपल्या अभिनयाची छाप उमटवली आहे. रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम' चित्रपटात त्यांनी साकारलेलं 'सुचित्रा भोसले' हे पात्र प्रेक्षकांच्या आजही लक्षात आहे. याशिवाय त्या रणवीर सिंहबरोबर 'सिम्बा' चित्रपटात झळकल्या होत्या. अलीकडेच त्या 'इंडियन पोलीस फोर्स' सीरिजमध्येही झळकल्या होत्या. त्यांचा बॉलीवूडमध्ये काम करण्याचा अनुभव कसा होता याबद्दल नुकत्याच एका मुलाखतीत सुचित्रा बांदेकर यांनी भाष्य केलं आहे. सुलेखा तळवलकर यांच्या 'दिल के करीब' कार्यक्रमात त्यांना हजेरी लावली होती. बॉलीवूडमध्ये गाजलेल्या 'सिंघम' चित्रपटात काम करण्याची संधी कशी मिळाली याबद्दल सांगताना सुचित्रा बांदेकर म्हणाल्या, ""सिंघम'च्या वेळी मला एका गृहस्थाचा फोन आला होता. त्यांनी मला फोनवर 'सुचित्रा बांदेकर का? आम्हाला तुम्हाला कास्ट करायचं आहे. रोहित शेट्टी प्रोडक्शनमधून बोलतोय.' कारण, मला त्या पहिल्या फोनवर तो 'द रोहित शेट्टी' आहे, तो मोठा दिग्दर्शक असं काहीच सुचलं नाही."सुचित्रा पुढे म्हणाल्या, "त्यानंतर त्या गृहस्थाने मला पुन्हा फोन केला आणि तुम्हाला कळतंय का मला काय म्हणायचंय? असा प्रश्न त्याने मला विचारला. यावर मी म्हणाले.

# कंगनाने अमिताभ यांच्याशी केली तुलना

लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौत निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. ती सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात व्यग्र आहे. कंगना हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून भाजपाची उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहे. ती मंडी मतदारसंघात अनेक ठिकाणी प्रचारसभा घेत आहे व रॅलीमध्ये भाषणं देत आहे. आता एका निवडणूक रॅलीतील तिच्या भाषणाची सोशल मीडियावर खूप चर्चा होत आहे. या भाषणात तिने स्वतःची तुलना बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांच्याशी केली."संपूर्ण देश आश्चर्यचकित झाला आहे की मी राजस्थानला जावो, पश्चिम बंगालला जावो, दिल्लीला जावो किंवा मणिपूरला, लोक माझ्यावर इतकं प्रेम करतात, इतका आदर करतात. मी दाव्याने सांगू शकते की अमिताभ बच्चन यांच्यानंतर इंडस्ट्रीत इतकं प्रेम व आदर जर कुणाला मिळत असेल तर ती फक्त मी आहे," असं कंगना रणौत प्रचाराच्या भाषणात म्हणाली. कंगना रणौतचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर नेटकरी तिच्या फ्लॉप चित्रपटांचा उल्लेख करत तिला ट्रोल करत आहेत. "कंगनाचा शेवटचा हिट चित्रपट २०१५ मध्ये आला होता आणि त्यानंतर तिने बॅक टू बॅक १५ फ्लॉप चित्रपट दिले आणि इथे ती स्वतःची तुलना अमिताभ बच्चन यांच्याशी करत आहे", अशा शब्दांत कंगनाची खिल्ली उडवत एका व्हेरिफाईड पॅरोडी अकाउंटने तिचा व्हिडिओ शेअर केला आहे.मंडी लोकसभा मतदारसंघासाठी १ जूनला मतदान होणार आहे. हे शेवटच्या, सातव्या टप्प्यातील मतदान होईल. २०१९ मध्ये या मतदारसंघातून भाजपाचे राम स्वरुप शर्मा यांनी निवडणूक लढवली होती व ते विजयी झाले होते. पण २०२१ मध्ये त्यांच्या निधनानंतर या जागेवर झालेल्या पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या प्रतिभा सिंह विजयी झाल्या होत्या.कंगना रणौत मुळची हिमाचल प्रदेशच्या मंडी जिल्ह्यातील आहे. याच ठिकाणाहून तिला भाजपाने लोकसभा निवडणुकीसाठी रिंगणात उतरवलं आहे. याठिकाणी शेवटच्या टप्प्यात मतदान होणार आहे. त्यापूर्वी कंगना रणौत मतदारसंघात फिरून प्रचारसभा घेत आहे. या निवडणुकीत कंगना रणौतला मतदार स्वीकारणार की नाही ते निकालांची घोषणा झाल्यावरच कळेल.लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्री कंगना रणौत निवडणुकीच्या मैदानात उतरली आहे. ती सध्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात व्यग्र आहे. कंगना हिमाचल प्रदेशातील मंडी मतदारसंघातून भाजपाची उमेदवार म्हणून निवडणूक लढवत आहे. ती मंडी मतदारसंघात अनेक ठिकाणी प्रचारसभा घेत आहे व रॅलीमध्ये भाषणं देत आहे. आता एका निवडणूक रॅलीतील तिच्या भाषणाची सोशल मीडियावर खूप चर्चा होत आहे. या भाषणात तिने स्वतःची तुलना बॉलीवूडचे महानायक अमिताभ बच्चन यांच्याशी केली."संपूर्ण देश आश्चर्यचकित झाला आहे की मी राजस्थानला जावो, पश्चिम बंगालला जावो, दिल्लीला जावो किंवा मणिपूरला, लोक माझ्यावर इतकं प्रेम करतात.



# ऋचा घोषची वादळी खेळी!

## » टीम इंडियाने पहिल्यांदाच ओलांडली दोनशेची वेस

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**महिला आशिया चषक २०२४ मध्ये भारताने सलग दुसरा सामना जिंकला. टीम इंडियाने यूएईचा ७८ धावांनी पराभव केला. पहिल्या सामन्यात भारताने पाकिस्तानचा पराभव केला होता. आता दुसरा सामनाही जिंकला. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने २०२ धावांचे लक्ष्य दिले होते. यादरम्यान ऋचा घोष आणि हरमनप्रीत कौर यांनी स्फोटक खेळी खेळली. भारताने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या यूएईचा संघ ७ गडी गमावून केवळ १२३ धावा करू शकला. अशा प्रकारे भारतीय महिला संघाने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच दोनशे धावांचा टप्पा इतिहास रचला. त्याचबरोबर २०१ धावा ही महिला टी-२० आशिया कपच्या इतिहासातील कोणत्याही संघाची सर्वोच्च धावसंख्या आहे.**




या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने ५ गडी गमावून २०१ धावा केल्या. यादरम्यान ऋचाने गोलंदाजांची दमछाक केली. तिने २९ चेंडूत नाबाद ६४ धावा केल्या. रिचाच्या या खेळीत १२ चौकार आणि १ षटकारांचा समावेश होता. हरमनप्रीतने ४७ चेंडूत ६६ धावा केल्या. तिने ७ चौकार आणि एक षटकार मारला. याआधी सलामीवीर शफाली वर्माने ३७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. १८ चेंडूंचा सामना करताना तिन ५ चौकार आणि १ षटकार मारला. टीम इंडियासाठी दीप्ती शर्माने गोलंदाजीत शानदार कामगिरी केली. तिने ४ षटकात २३ धावा देत २ विकेट्स घेतल्या. रेणुका सिंगने ४ षटकात २० धावा देत १ विकेट घेतली. तनुजा कंवरने ४ षटकात १४ धावा देत १ विकेट घेतली. पूजाने ४ षटकात २७ धावा देत १ १ विकेट घेतली. राधा यादवनेही एक विकेट घेतली. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात भारतीय महिला संघाने २०० हून अधिक धावा करण्याची ही पहिलीच वेळ आहे. असे यापूर्वी कधीच घडले नव्हते. २०१ धावा ही भारतीय महिला संघाची टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वोच्च धावसंख्या आहे.२०१ धावा ही महिला टी-२० आशिया कपच्या इतिहासातील कोणत्याही संघाची सर्वोत्तम धावसंख्या आहे. भारतीय महिला संघाने आपलाच दोन वर्षे जुना विक्रम मोडला आहे. यापूर्वी भारतीय महिला संघाने २०२२ मध्ये मलेशियाच्या महिला संघाविरुद्ध १८१ धावा केल्या होत्या.महिला आशिया चषक २०२४ मध्ये भारताने सलग दुसरा सामना जिंकला. टीम इंडियाने यूएईचा ७८ धावांनी पराभव केला. पहिल्या सामन्यात भारताने पाकिस्तानचा पराभव केला होता. आता दुसरा सामनाही जिंकला. प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने २०२ धावांचे लक्ष्य दिले होते. यादरम्यान ऋचा घोष आणि हरमनप्रीत कौर यांनी स्फोटक खेळी खेळली. भारताने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या यूएईचा संघ ७ गडी गमावून केवळ १२३ धावा करू शकला. अशा प्रकारे भारतीय महिला संघाने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पहिल्यांदाच दोनशे धावांचा टप्पा इतिहास रचला. त्याचबरोबर २०१ धावा ही महिला टी-२० आशिया कपच्या इतिहासातील कोणत्याही संघाची सर्वोच्च धावसंख्या आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना टीम इंडियाने ५ गडी गमावून २०१ धावा केल्या. यादरम्यान ऋचाने गोलंदाजांची दमछाक केली. तिने २९ चेंडूत नाबाद ६४ धावा केल्या.

### 200 धावा करण्याची पहिलीच वेळ

रिचाच्या या खेळीत १२ चौकार आणि १ षटकारांचा समावेश होता. हरमनप्रीतने ४७ चेंडूत ६६ धावा केल्या. तिने ७ चौकार आणि एक षटकार मारला. याआधी सलामीवीर शफाली वर्माने ३७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. १८ चेंडूंचा सामना करताना तिन ५ चौकार आणि १ षटकार मारला.टीम इंडियासाठी दीप्ती शर्माने गोलंदाजीत शानदार कामगिरी केली. तिने ४ षटकात २३ धावा देत २ विकेट्स घेतल्या. रेणुका सिंगने ४ षटकात २० धावा देत १ विकेट घेतली. तनुजा कंवरने ४ षटकात १४ धावा देत १ विकेट घेतली. पूजाने ४ षटकात २७ धावा देत १ १ विकेट घेतली. राधा यादवनेही एक विकेट घेतली. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात भारतीय महिला संघाने २०० हून अधिक धावा करण्याची ही पहिलीच वेळ आहे. असे यापूर्वी कधीच घडले नव्हते.

# शमीचा धोनीच्या निवृत्तीच्या प्लॅनबद्दल खुलासा

## » तुमचे शरीर तुम्हाला संकेत देण्यास सुरुवात करते : शमी

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**एमएस धोनी आयपीएलमधून निवृत्ती कधी जाहीर करणार? हा एक प्रश्न आहे, ज्याचे उत्तर अजून मिळायचे आहे. माहीने ऑगस्ट २०२० मध्ये आपल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीला अलविदा केला होता. पण तो आयपीएलमध्ये सीएसकेसाठी खेळत आहे. धोनी आयपीएल २०२४ चा हंगामा सुरु होण्यापूर्वीपर्यंत धोनी निवृत्त होईल अंदात वर्तवला होता. मात्र, धोनीने हा हंगामही खेळताना दिसला. त्यामुळे माही कधी निवृत्त होणार या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नाही. आता धोनीच्या निवृत्तीच्या प्लॅनबद्दल वेगवान गोलंदज मोहम्मद शमीने खुलासा केला आहे.**







शुभंकर मिश्राच्या यूट्यूब चॅनलवर बोलताना मोहम्मद शमी म्हणाला, "तुम्ही (मीडिया) लोक त्याच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह लावत आहात. तो माणूस स्वत: म्हणतोय वेळ आल्यावर सांगेन. त्यामुळे हा प्रश्न तुम्ही सारखा विचारु नये. याबाबत माही भाईशी माझी चर्चा झाली आहे. ज्यामध्ये मी विचारले होते की खेळाडूने कधी निवृत्ती घ्यावी? यावर तो म्हणाला, एक म्हणजे जेव्हा तुम्हाला स्वतःला कंटाळा आल्यावर आणि दुसरे म्हणजे, जेव्हा तुम्हाला असे वाटते की तुम्हाला लाथ मारली जाईल (जेव्हा तुम्हाला कळेल की तुम्हाला संघातून वगळण्यात येईल) तेव्हा निवृत्ती घ्यावी."मोहम्मद शमी पुढे म्हणाला, "पण पहिली आणि सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हा तुम्ही खेळाचा आनंद घेणे थांबवता, तेव्हा तुमचीवेळ आल्याचे लक्षण आहे. निवृत्तीसाठी सर्वोत्तम वेळ निवडल्यास ते अधिक चांगले होईल. कारण तुम्ही विशिष्ट स्वरूप राखू शकत नसल्यास तुमचे शरीर तुम्हाला संकेत देण्यास सुरुवात करते.जेव्हा खेळाडूने त्याच्या निवृत्तीची वेळ मानली पाहिजे."

### धोनी सर्वात यशस्वी कर्णधार

एमएस धोनी असला कर्णधार आहे, ज्याने टीम इंडियासाठी सर्वात जास्त आयसीसी ट्रॉफी जिंकल्या आहेत. धोनीच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने २००७ टी-२० विश्वचषक, २०११ एकदिवसीय विश्वचषक आणि २०१३ चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकली आहे.एमएस धोनी आयपीएलमधून निवृत्ती कधी जाहीर करणार? हा एक प्रश्न आहे, ज्याचे उत्तर अजून मिळायचे आहे. माहीने ऑगस्ट २०२० मध्ये आपल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीला अलविदा केला होता. पण तो आयपीएलमध्ये सीएसकेसाठी खेळत आहे. धोनी आयपीएल २०२४ चा हंगामा सुरु होण्यापूर्वीपर्यंत धोनी निवृत्त होईल अंदात वर्तवला होता. मात्र, धोनीने हा हंगामही खेळताना दिसला. त्यामुळे माही कधी निवृत्त होणार या प्रश्नाचे उत्तर कोणाकडेच नाही. आता धोनीच्या निवृत्तीच्या प्लॅनबद्दल वेगवान गोलंदज मोहम्मद शमीने खुलासा केला आहे. शुभंकर मिश्राच्या यूट्यूब चॅनलवर बोलताना मोहम्मद शमी म्हणाला, "तुम्ही (मीडिया) लोक त्याच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह लावत आहात.